# महाराष्ट्र शासन

क्र. मअसे/५५-बी/असेस-२०२४/ 1298

टेलि : २६६७७५५५

Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.

दिनांक : ०४.१२.२०२३

## परिपत्रक

विषय : दि.१४ ते २० एप्रिल, २०२४ या कालावधीत "अग्निशमन सेवा सप्ताह" पाळण्यांबाबत निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करणे.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचनेनुसार दि.१४ ते २० एप्रिल, २०२४ या कालावधीत संपूर्ण राज्यात **अग्निशमन सेवा सप्ताह** पाळण्यांत येणार आहे. या सप्ताहाचा एक भाग म्हणून प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी खालील विषयानुसार राज्यस्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यांत येणार आहे.

***निबंध स्पर्धेसाठी विषय*** :

मराठी - - " समाजामध्ये अग्निसुरक्षा जागरुकतेबाबतचे महत्व "

हिंदी - - " समाज में अग्निसुरक्षा जागरुकता का महत्व "

इंग्रजी - - **" IMPORTANCE OF FIRE AWARENESS IN SOCIETY".**

***चित्रकला स्पर्धेसाठी विषय*** :

मराठी - - " घरातील अग्निसुरक्षा "

हिंदी - - " घर में अग्निसुरक्षा "

इंग्रजी - - **"FIRE SAFETY AT HOME".**

**स्पर्धेसंबंधी नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत.**

१. दोन्ही स्पर्धा फक्त इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थी / विद्यार्थीनीसाठी आहे.

२. या स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व शाळा सहभागी होऊ शकतात.

३. दोन्ही प्रकारच्या स्पर्धा शाळा प्रमुखांनी त्यांच्या सोयीनुसार आयोजित करावयाच्या असून भाग घेणा-या स्पर्धकांपैकी निबंध व चित्रकला स्पर्धा यांच्या प्रत्येकी अधिकतम सहा

कृ.मा.प.

उत्कृष्ट प्रवेशिका सिलबंद पाकीटातून **दि.२९.०२.२०२४** पर्यंत या संचालनालयास पाठवावयाच्या आहेत.

४. स्पर्धेसाठी कागद, पेंटींग पेपर, रंग व इतर साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.

५. प्रत्येक स्पर्धेचा कालावधी दिड तास असेल.

६. निबंध स्पर्धेसाठी १३" x ८" आकाराचा ओळीचा कागद वापरावा. निबंध केवळ **मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत** कमाल ५०० शब्दांपर्यंत असावेत.

७. चित्रकला स्पर्धेसाठी १५" x ११" आकाराचा ड्रॉईंग पेपर वापरावा.

८. प्रत्येक स्पर्धेसाठी विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी व प्रमाणपत्रे **दि.२० एप्रिल, २०२४** रोजी होणा-या अग्निशमन सेवा सप्ताहाच्या समारोप समारंभ प्रसंगी प्रदान करण्यांत येतील. यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास/दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्रथम क्रमांक | : | सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| (२) | व्दितीय क्रमांक | : | सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| (३) | तृतीय क्रमांक | : | सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| (४) | उत्तेजनार्थ (तीन बक्षिसे): | | केवळ प्रमाणपत्र |

९. विजयी स्पर्धकांना समारंभात हजर राहण्याबाबत पत्राने कळविण्यांत येईल.

**१० निबंध व चित्रकला स्पर्धेतील स्पर्धकांनी प्रवेशिकाच्या मागील बाजूस स्वतःचे संपूर्ण नांव, इयत्ता, घरचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी /मोबाईल क्रमांक, शाळेचे नांव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक सुवाच्च अक्षरात लिहिणे आवश्यक आहे.**

११. शाळा प्रमुखांना प्रत्येक स्पर्धेसाठी अधिकतम सहा प्रवेशिका स्वतंत्रपणे पाठवावयाच्या असून प्रत्येक पाकीटावर ठळक अक्षरात **"अग्निशमन सेवा सप्ताह-२०२४-निबंध-चित्रकला स्पर्धा"** प्रवेशिका असा उल्लेख करावा. शाळा प्रमुखांनी प्रवेशिका पाठवितांना त्यावर स्पर्धकाचे संपूर्ण नांव, पत्ता व दूरध्वनी या बाबी नोंदविल्या आहेत किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी.

१२. निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा यांच्या परीक्षकांचा निकाल अंतिम मानण्यांत येईल व या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३. या संदर्भात अधिक माहिती आवश्यक असल्यास दूरध्वनी क्र.२६६७ ७५५५/ मो.८३६९०७४५७४ वर कृपया संपर्क साधण्यांत यावा.

वारीक 08/12/23

**(एस.एस.वारीक)**
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा